

माणसाचा
एकच धर्म
असावा
सत्याने
वर्तवा
ज्योती म्हणे

# रयत दर्पण



स्वावलंबी
शिक्षण
हेच
आमचे
ब्रीद.

महात्मा फुले महाविद्यालय बी.व्होक मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम २०२१-२०२२ विभागाअंतर्गत



# ‘रयत’ विद्यापीठ जूनपासून होणार सुरु

**रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा ६३ वा स्मृतिदिन सोमवारी (९ मे) साताऱ्याच्या त्यांच्या समाधीस्थळावर पार पडला. या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी बोलताना ’येत्या जूनपासून पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सुरू करू’ अशी घोषणा केली आहे. त्यामुळे आता लवकरच रयतेचे विद्यापीठ तयार होणार असल्याची माहिती समोर येत आहे.**

**संस्कृती पवार**

## कर्मवीर भाऊराव पाटलांच्या स्मृतिदिनानिमित्त शरद पवारांची मोठी घोषणा



या कार्यक्रमात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले की , ‘‘कोरोना नंतर पहिल्यांदाच हा कर्मवीर स्मृतिदिन समारंभ पार पडला. मात्र या कार्यक्रमाला न चुकता हजेरी लावणारे डॉ. एन. डी. पाटील, आमदार गणपतराव देशमुख, शंकरराव कोल्हे आज नाहीत. त्यामुळे मी अस्वस्थ आहे. संस्थेची वाटचालही वेग धरताना पाहायला मिळत आहे. कर्मवीर अण्णांनी ग्रामीण भागात शिक्षणाचं जे रोपटे लावले त्याचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. बदलत्या काळाचे आधुनिक तंत्रज्ञान मुलांपर्यंत पोहोचतेय. यामध्ये संस्थेचा वाटा मोठा आहे. याचा मला अभिमान आहे.

रयत शिक्षण संस्थेचे विद्यापीठ व्हावे अशी इच्छा कर्मवीर भाऊराव पाटलांची होती. त्यामुळे संस्थेला मोठे स्वरूप देण्यासाठी रयत विद्यापीठ स्थापन केले जाणार असून त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने परवानगी दिली आहे. तसेच इतर प्रक्रिया अंतिम टप्प्यात आल्या आहेत‘‘. कार्यक्रमात बोलताना गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील म्हणाले, ‘‘कर्मवीर अण्णांच्या आदर्शातून रयत शिक्षण संस्था काम करत आहे. या संस्थेला अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली शैक्षणिक दिशा मिळाली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली रयतच्या शाळांमध्ये अनेक राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय उपक्रम राबविले जात आहेत.’’

कार्यक्रमाला खासदार शरद पवार, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, संस्थेचे चेअरमन डॉ अनिल पाटील,रामशेठ ठाकूर, पालकमंत्री बाळासाहेब पाटील, मंत्री विश्वजित कदम, खासदार सुप्रिया सुळे, आमदार प्रशांत ठाकूर, शशिकांत शिंदे, माजी आयुक्त प्रभाकर देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी उपस्थिती लावली.

शरद पवार यांच्या हस्ते गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांना ‘इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव पुरस्कार’ देऊन



गौरवण्यात आले. तसेच बीजमाता राहीबाई पोपेरे यांना ‘रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील राष्ट्रीय पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. तसेच माजी मंत्री गणपतराव देशमुख यांना (मरणोत्तर) जाहीर झालेला ‘डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राष्ट्रीय पुरस्कार’ त्यांच्या पत्नी रतनबाई देशमुख व कुटुंबीयांनी स्वीकारला. या कार्यक्रमादरम्यान रयत विज्ञानपत्रिकेचे प्रकाशन, देणगीदार, गुणवंत विद्यार्थी, राज्य शिक्षक पुरस्कार, आदर्श महाविद्यालय, कर्मवीर पारितोषिकांचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## भारताने केली श्रीलंकेला तीन अब्ज रुपयांची मदत

**प्रिया कांबळे**

श्रीलंकेत आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक आणीबाणी आली आहे. देशात हाहाकार माजला आहे. लोकांना दोन वेळचे अन्न देखील मिळत नाही अशातच भारताने श्रीलंकेला ३.५ अब्ज रुपयांची मदत करून माणुसकी धर्म निभावला आहे.

श्रीलंकेतील लोकांना सध्याच्या या संकटावर मात करण्यासाठी भारताने मदतीचा हात पुढे केला आहे. भारताने आतापर्यंत ३.५ अब्ज डॉलरपेक्षा अधिक किंमतीची मदत श्रीलंकेला केली आहे,असे परराष्ट्र मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे.

श्रीलंकन रुपयाची किंमत सातत्याने कोसळत आहे. मार्चमध्ये एका डॉलरची किंमत २०१ श्रीलंकन रुपये होती. ती आता ३६० श्रीलंकन रुपयापर्यंत वाढली आहे. महागाई गगनाला भिडली आहे. श्रीलंकेत महागाईचा दर हा १७ टक्केचा आकडा पार केला आहे.

नागरिक आक्रमक झाले असून रस्त्यावर उतरले आहेत. यादरम्यान महिंदा यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला आहे. देशात कर्फ्यु लावण्यात आला असून राजधानी कोलंबोमध्ये सैन्य दल तैनात करण्यात आले आहे. महिंदा यांनी त्रिकोमालीच्या पूर्वेकडील बंदर जिल्ह्यातील नौदल तळावर आश्रय घेतल्याचे वृत्त असल्याने आंदोलकांनी तिकडे धाव घेतली होती. अनेक राजकीय नेत्यांची घरं जाळण्यात आली आहेत तसेच या हिंसाचारात एक खासदाराने स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केली आहे. आतापर्यंत हिंसाचारात किमान ८ लोकांचा मृत्यू झाला आहे तर २५० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

## पुण्याचे सांस्कृतिक वैभव असलेले बालगंधर्व रंगमंदिर पाडणार?

**यशोदा नाईकवाडे**

पुणे

पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासाच्या नावाखाली बालगंधर्व रंगमंदिर पाडण्यावर आता शिक्कामोर्तब झाला आहे. बालगंधर्व रंगमंदिराची सध्याची वास्तू पाडून तेथे नाट्यसंकुल उभारण्यात येणार असून तीन विविध आसनक्षमतेची नाट्यगृहे, तीन कलादालने, खुला रंगमंच आणि उपाहारगृह बांधण्याचे नियोजित करण्यात आले आहे.

दोन वर्षांपूर्वीही बालगंधर्व रंगमंदिराचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. पण या प्रस्तावाला पुणेकर, राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि नाट्यकर्मींनी विरोध केला होता. यामुळे तेव्हा या निर्णयाला स्थगिती देण्यात आली होती. मात्र आता पुन्हा हा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

बालगंधर्व रंगमंदिर या वास्तूशी पुणेकरांचे भावनिक नाते आहे. अनेक दिग्गजांनी येथे नाटके केली आहेत. त्यामुळे पुणेकरांची नाळ याच्याशी जोडली गेली आहे. नाट्यकर्मी आणि निर्मात्यांनी बालगंधर्व रंगमंदिर न पाडता त्याचा विकास करावा अशी मागणी केली आहे.




## तृतीयपंथीयांच्या रोजगारासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उचलली पावले

**अक्षय पानढवळे**

कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने तृतीयपंथी यांसाठी एक पाऊल पुढे टाकलं आहे. त्यांना रोजगारासाठी च्या संधी निर्माण करण्याचं काम महानगरपालिका करणार आहे.

पिंपरी-चिंचवड मध्ये रस्त्यारस्त्यावर चौकामध्ये दुकानदाराकडे तृतीयपंथी पैसे मागताना दिसतात. मात्र आता त्यांना सन्मानाने रोजगार करून आपले पोट भरता येणार आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त अजय चारठाणकर म्हणाले की, तृतीयपंथीयांना समाजात सन्मानाची वागणूक दिली जात नाही. त्यामुळे त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे पिंपरी-चिंचवड हद्दीतील उद्यानाच्या देखभालीचे काम सुरक्षा रक्षकाचे काम स्वच्छतागृहांची स्वच्छता अशी कामे तृतीयपंथीयांना देण्यात येणार आहे.

२०२२-२३ च्या अर्थसंकल्पात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने तृतीयपंथीयांच्या साठी २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. तृतीयपंथीयांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



यातून नक्कीच तृतीयपंथीना रोजगारच्या व आत्मनिर्भरतेच्या नव्या वाटा मोकळ्या होतील. असे प्रयत्न राज्यभर होणे गरजेचे आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यांनी, महानगरपालिकांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आदर्श घ्यायला हवा.

– दिशा पिंकी शेख

तृतीयपंथीयांना समाजात नेहमी वेगळी वागणूक दिली जाते. त्यांचा नेहमीच तिरस्कार केला जातो पिंपरी चिंचवड महानगरपालिका नेहमीच या घटकांसाठी विविध उपक्रम राबवत असते. आता तृतीयपंथीयांना या स्वयंरोजगाराचा कितपत फायदा होतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## प्राचार्य पांडुरंग गायकवाड यांचा होणार ‘सेवापूर्ती गौरव सोहळा’

**यशोदा नाईकवाडे**

पिंपरी: रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग निवृत्ती गायकवाड यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन केले असून महाराष्ट्राचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील आणि माजी कुलगुरू डॉ.नागनाथ कोतापल्ले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड सेवापुर्ती गौरव सोहळा समितीने या सोहळ्याचे आयोजन केले असून शनिवारी २८ मे रोजी सकाळी १० वाजता चिंचवड येथील प्राध्यापक रामकृष्ण मोरे




प्रेक्षागृहात हा सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक माजी महापौर व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य संजोग वाघेरे पाटील यांनी केले आहे. प्राचार्य पांडुरंग गायकवाड यांनी महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करत असतांना एक कुटुंबप्रमुख म्हणून काम पाहिले. महाविद्यालयातील शिक्षक वृंद आणि विद्यार्थी यांना केंद्रबिंदू समजून सेवा दिली. त्यांचा दांडगा अभ्यास, अनुभव आणि सर्वांना सोबत घेवून, मनमिळावू वृतीने केलेल्या कामांमुळे महाविद्यालयाचे नाव तर उंचावलेच परंतु प्राचार्य गायकवाड यांनी सर्वांच्याच मनात आपलेपणाचे स्थान निर्माण केले आहे. त्यांनी शिकविलेले धडे आणि सांगितलेला कानमंत्र याची शिदोरी सोबत घेवून अनेक विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यांचा हा सेवापूर्ती सोहळा मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे.

## रयत सोडताना......

नमस्कार मी प्राचार्य पांडुरंग गायकवाड. या २८ तारखेला सेवापुर्ती सोहळ्याच्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेतला मधला माझा शेवटचा दिवस.

मला गेली ३६ वर्षे रयत शिक्षण संस्थेने, संस्थेच्या कार्यकारणीने, शाखाप्रमुखांनी, संस्थेच्या सर्व शिक्षकांनी, माझ्या प्रिय विद्यार्थी मित्रांनी भरभरून प्रेम दिलं. त्यामुळे आज रयत सोडताना माझे डोळे भरून आले आहेत. रयतमधून मी फक्त सेवानिवृत्त होत आहे. मात्र रयतचे प्रेम रयतबद्दलची आस्था माझ्या मनात कायम राहील. त्यामुळे आज रयत सोडताना खुप समाधानी आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक विकासासाठी अध्ययन व अध्यापन यासोबत संबधित विषयातील ज्ञान वाढविण्यासाठी विविध व्याख्यान, प्रदर्शन, शिबीर आयोजित करावी अशी माझी नेहमी इच्छा असायची आणि यासाठी माझा शिक्षकवृंद नेहमी सक्रिय असायचा. माझ्या मनातील आदर्श विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न प्रत्येक शिक्षकाने केला याचा मला सार्थ अभिमान आहे. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या चर्चासत्र, कार्यशाळेत मी आवर्जून उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न माझा राहिला. याने मी सुखावलो गेलो हे मात्र नक्की! मला अनेक चांगले,वाईट अनुभव आले. अनेक विद्यार्थी भेटले. त्यापैकी काही हुशार तर काही खोडकर, परंतु शिक्षकासाठी प्रत्येक विद्यार्थी हा मुलाप्रमाणे असतो. त्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याकडून जरी कधी ही चूक झाली, तरीही माझ्या मनात त्याच्याबद्दल तेवढीच आस्था आहे. आणि ती कायम राहील.

आमच्या घरात वारकरी



संप्रदायाचा तीन पिढ्यांचा समृध्द वारसा लाभला आहे.

हा वारसा लाभल्यामुळे माझ्यावर आणि माझ्या भावंडांवर वडिलांनी शिक्षणाचे केलेले संस्कार हे आजही आम्ही विसरू शकत नाही. माझा मुलगा डॉ प्रतिक हा एम.डी. झाला असून त्याचे स्वतःचे मंचरमध्ये विघ्नहर्ता हॉस्पिटल आहे. मुलगी डॉ.प्रतिमा ही बी.डी.एस असून जावई डॉ.पवन हे एम.डी.एस आहेत. माझी पत्नी शीला ही नुकतीच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षिका म्हणून सेवानिवृत्त झाली आहे. अशा कुटुंबाचा मला नेहमीच पाठिंबा राहिला आहे. यांचा असलेला पाठिंबा हा मला नेहमीच अडचणीच्या काळात बळ आणि साथ देणारा ठरला.

१९८६ पासून आजवर केलेल्या कामाचे समाधान मला आहेच, पण एवढ्यावरच न थांबता अण्णांच्या विचारांची शिदोरी घेऊन यापुढेही मी शैक्षणिक, सामाजिक कर्तव्य पार पाडत राहणार आहे. निवृत्त होत असताना मी संस्थेचा कृतज्ञ आहे, ज्या ज्या कॉलेजमध्ये काम केले. त्या प्रत्येक कॉलेजचा विशेषतः अण्णासाहेब आवटे कॉलेज पिंपरी चे महात्मा फुले महाविद्यालय या दोन कॉलेजचा माझ्या आयुष्या मध्ये नक्कीच मोलाचा वाटा आहे. माझ्या कार्यकाळात रयतेच्या विविध शाखांमध्ये झालेल्या विविध इमारती, सुरु झालेले विविध कोर्सेस व इतर सुविधा हे सगळं मी करू शकलो. याचे श्रेय मी संस्थेला व संस्थेमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना आवर्जून देऊ इच्छितो. मी महाविद्यालयांचा कृतज्ञ आहे, माझ्या सहकाऱ्यांचा कृतज्ञ आहे, विद्यार्थ्यांचा कृतज्ञ आहे या सर्वांचे मी आभार मानतो कारण आजवर विद्यार्थ्यांनी माझ्यावर खुप प्रेम केलं. माझ्या सर्व सहकाऱ्यांचे मी मनापासून आभार मानतो अणि इथून गेल्यानंतर सुद्धा आपल्यातील संबंध असेच राहतील अशी ग्वाही देतो. तसेच आतापर्यंतच्या जीवनप्रवासात रयत शिक्षण संस्थेने मला दिलेल्या साथसोबतीसाठी मी रयतेचा आणि कर्मवीर अण्णांचा मी आभारी राहील.

**शब्दांकन- यशोदा नाईकवाडे**

# रशिया - युक्रेन संघर्ष आणि भारत



प्रा. दत्तात्रय बिडबाग

आज रशियाने युक्रेन वर लष्करी हल्ला करून ८३ दिवस झाले. फक्त एक दोन दिवसात संपूर्ण युक्रेन गिळंकृत करु पाहणारे रशिया चे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे मनसुबे हे युक्रेन अध्यक्ष वोलोदिमेर झेलेंस्कि यांनी धुळीस तर मिळवले परंतु ज्या खंबीरपणे राष्ट्राचे नेतृत्व केले व या युध्दाला निर्णायक कलाटणी देणारे निश्चित ठरणारे दिसत आहे. हाच प्रसंग अफगाणिस्तान मध्ये अश्रफ घनी यांच्या बाबत आपण सर्वानी पाहिला तालिबानच्या हल्ला वेळी घनी यांनी मायदेश सोडुन तत्काळ पलायन केले. मात्र झेलेंस्कि यांनी पलायन न करता किव सोडल नाही यामुळेच पुतिन यांचे मनसुबे उधळुन लावले अर्थात या मध्ये पाश्चिमात्य देशांचा आणि विशेषता अमेरिकेचा त्यापाठीमागे भक्कम असणारा पाठिंबा सशस्त्र आणि आर्थिक मदत हे आपणाला विसरता येणार नाही.

याचे उदाहरण म्हणजे काळ्या समुद्रात नेपच्युन मिसाईल द्वारे रशियन नौदलाचे शक्तीशाली जहाज मोस्कोवा युक्रेन ने बुडविले असा दावा केला गेला. अर्थात या कृती मागे पाश्चिमात्याची मदत आहे तर यालाच विरोधीभासी दुसरा दावा रशियन नौदलाने केला की जहाजा वर असणाऱ्या शस्त्र साठ्याला आग लागल्या मुळे जहाजाला जल समाधी मिळाली. यामागे जगा मध्ये आपली होणारी नाचक्की रोखणे हा हेतु रशियाचा आहे याच्यातील दोन्ही दावे थोडी बाजुला केली तरी हेच दिसून येती कि मनोवैज्ञानिक हा झेलेंस्किचा विजय आहे. दुसऱ्या महायुध्दा नंतर एवढे शक्तिशाली जहाज बुडले गेले. याचा नक्कीच रशियन सशस्त्र दलांच्या मनोबला वर परिणाम झालेला दिसतोय. आज पर्यंत ब्रिटिश मिलिट्ररी इंटेलिजन्सच्या रिपोर्ट नुसार रशियाने युक्रेनमध्ये त्याच्या एक तृतीयांश ग्राउंड कॉम्बॅट फोर्स गमावल्याचा अंदाज लावला आहे. आपल्या पेक्षा सैन्य क्षमतेने दुबळा असणार युक्रेनचा निर्णायक पाडाव होत नाही हा एक प्रकारे यामध्ये पुतिन यांचा पराभव स्पष्ट दिसुन येत आहे. सध्या तरी पुतिन त्यांची युक्रेन पुर्णपणे गिळंकृत करणे ही रणनीती स्पशेल फसलेली दिसते.त्यामुळेच ते आपली रणनीती ही बदल करतायत. किव किंवा खारकिव या शहरी भागातुन रशियन सैन्य माघारी पडताना आपण पाहतोय त्या ऐवजी युक्रेनच्या पुर्व- पाश्चिम भागाला लागुन असलेल्या डोनबास, लुहंस्क या भागावर रशियन सैन्य जोरदार पुन्हा मोर्चेबाधणी करतायत. या ८३ दिवसांच्या संघर्षात आपणाला हे दिसुन येत आहे पुतिन हे आंतरराष्ट्रीय पातळीवर एकटे पडलेत आणि हा संघर्ष जेवढा दिवस लांबत जाईल तेवढा हा प्रश्न जटिल होत आहे.

या परिस्थितीत जर पुतिन यांच्या सत्तेचे स्थान जर ढासळल तर ऐकाकी पडलेले पुतीन हे जगावर नवीन आरिष्ट नक्कीच घेऊन येतील यात शंकाच नाही. पुतिन यांच्या रशियाला जगात आर्थिक आघाडीवर एकटे पाडणे हा या समस्यावर उपाय निश्चित नाही. या मध्ये ब्रिक्स सारखी संघटना म्हणजेच चीन - भारत हे देश रशियाला निदान संवादच्या मार्गावर घेऊन येऊ शकतात परंतु हा संघर्ष असा चालु राहिला तर भारता सारख्या तटस्थ भुमिका स्वीकारलेल्या देशांना या बाबत नक्कीच पुन्हा विचार करावा लागेल.

# शिक्षण क्षेत्रातील प्रासादिक व्यक्तिमत्व : प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड



प्राचार्य डॉ.पी.व्ही.रसाळ

'शुध्द बीजापोटी। फळे रसाळ गोमटी' या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे नावातच पांडुरंग असलेल्या गायकवाड सरांनी भरपूर पुण्य केले असले पाहिजे. त्यामुळेच त्यांचा श्रेष्ठ कर्मयोग अनेकांना मार्गदर्शक ठरला आहे.सुसंस्कृत आणि वारकरी विचारांचे पाईक असलेल्या घरात जन्माला आलेल्या सरांना लहानपणापासूनच भगवदभक्तीची मोठी आवड निर्माण झाली.वडील वारकरी सांप्रदायिक कीर्तनकार होते. त्यामुळे भाऊबहिणी सर्वच वारकरी विचारांचे पाईक झाले. आपोआपच सत्कर्माचा संस्कार सरांच्या नसानसांत भिनला. प्रत्येक काम नेकीने,ईश्वरपूजा म्हणून करणे हाच धर्म बनला. रयत शिक्षण संस्थेमध्ये१८वर्षे प्राध्यापक व १७वर्षे प्राचार्य म्हणून काम करतांना सांप्रदायिक सदगुणांबरोबरच ज्या शिक्षण संस्थेत तीन तपे विविध महाविद्यालयांतून सेवा केली, त्या महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्थेचे संस्थापक महान कर्मयोगी,समग्र क्रांतीचे अग्रदूत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा पगडा गायकवाड सरांवर आहे, अठरा पगड जातीतील सर्वच विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे हा विचार सरांनी केलेल्या विविध प्रकारच्या कामांवरून दिसून येतो. त्यांच्या कार्याची ओळख करून देतांना मला असे म्हणावेसे वाटते की निस्वार्थपणे अखंडपणे वाहणारा झरा म्हणजे गायकवाड सर होत.शिक्षण हेच कर्म आणि सेवा हाच धर्म हे सूत्र जगत आलेल्या गायकवाड सरांचा परिचय एका चर्चासत्रातील व्याख्यानाच्या निमित्ताने झाला. त्यांच्या त्याभेटीने आमच्यात घट्ट मैत्री झाली.पुढे फोनवर नेहमी संपर्कातूनच ही मैत्री अधिक दृढ झाली.

विविध राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरील चर्चासत्रातील त्यांनी सादर केलेले शोधनिबंध बरेच काही सांगून जातात. त्यांच्याशैक्षणिक, प्रशासकीय, सामाजिक,अध्यात्मिक उंचीची ओळख करून देतात.सरांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नॅकसमितीवर निवड,२०१३ मध्ये पुणे विद्यापीठात सिनेटर म्हणून त्यांची निवड झाली होती. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे येथेविश्वस्त म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार,त्यांच्या कार्यकाळात मंचर महाविद्यालयाला आदर्श महाविद्यालय पुरस्कार, पिंपरी महाविद्यालयाला सेडा संस्थेचा आदर्श महाविद्यालय पुरस्कार, व अनेक संस्थानीं दिलेले पुरस्कार यातून सरांची पुनः पुन्हा नव्याने ओळख होत राहते. सन २०१२ मध्ये इटली येथे मराठी संत साहित्यावर शोध निबंध सादर करण्यासाठी त्यांची निवड झाली. कोईम्बतूर येथे आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात त्यांनी शोध निबंधाचे वाचन केले. सरांचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्यही असेच सुगंधीत जावो. आम्हां सर्वांना प्रेरणादायी ठरो. सर आपल्या गोड आयुष्याचे आरोग्यदायी शतक पूर्ण करोत अशी ईश्वरचरणी प्रार्थना करून लेखणीला विराम देतो.

# भोंग्याच्या आवाजात सगळं दडपतय..



गंगाप्पा पुजारी

देशाच्या राजकारणात सध्या राममंदिर आणि हनुमान चालिसा हेच विषय महत्वाचे बनले आहेत. नोकऱ्यांचा प्रश्न, गरिबीचा प्रश्न असे सगळेच मुद्दे निकाली लागल्याने त्या प्रश्नांकडे लक्ष केंद्रित केलं असावं. त्यामुळेच आता अनेक नेत्यांना हनुमानाची आठवण झाली आहे. बर ही भक्ती मुख्यमंत्र्याच्या घरासमोर केल्यास देव लवकर पावतो का असाही प्रश्न प्रत्येकाला पडला आहे. पण देशाच्या युवकांनो, तरुणांना तुम्ही मात्र सावध राहा. काळ सोकावत चालला आहे. पुढेतर आणखीनच भीषण परिस्थिती उभी राहणार आहे. या भोंग्याच्या आवाजात तुमच्या बेरोजगारीचा, महागाईचा, गरिबीचा सगळ्याचा आवाज दडपला जातोय. हिंदू मुस्लिमांच्या गर्दीत तुमच्या भविष्याला पद्धतशीर भोंगा लावला जातोय. तुमच्या प्रश्नांचा, गरजांचा आवाज त्या भोंग्यापेक्षा मोठा करा तरच तुम्ही तग धरू शकाल. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा तर आपल्या पाचवीला पुजलेला प्रश्न आहे. सोबतच आता ग्रामीण भागात युवकांची वाढलेली बेरोजगारी आणि पस्तिशी ओलांडूनही न होणारी लग्ने हा अलीकडच्या काळात काळजीत टाकणारा मुद्दा बनला आहे. चौकाचौकात, पारावर बेरोजगारांची वाढती संख्या, जीवघेणी महागाई, आणि शेतीची झालेली वाताहत असे अनेक प्रश्न सध्या आ वासून उभे आहेत.

आता देशाचीही प्रगती यापेक्षा काही वेगळी नाहीच. देशाच्या विकासाचा आलेख पाहायचा झालाच तर नुकत्याच समोर आलेल्या आकडेवारीनुसार एका वर्षात ३ कोटी लोकांनी आपला रोजगार गमावला आहे, गॅसच्या सर्वाधिक किमतीत भारताचा पहिला क्रमांक आहे. पेट्रोल च्या किमतीत जगात तिसरा तर डिझेलच्या किमतीत जगात आठवा क्रमांक आहे. ही सगळी आकडेवारी देशाच्या विकासासाठी, भविष्यातील वाटचालीसाठी नक्कीच समाधानकारक नाही मात्र तरीही एकही नेता यावर बोलताना दिसत नाही. टीका, टिप्पण्या , इडीच्या धाडी आणि चिखलफेकीच्या राजकारणात तरुणांच्या स्वप्नांचा मात्र चुराडा होताना दिसत आहे. सामान्य जनतेचे प्रश्न, गरिबी असे कितीतरी मुद्दे आहेत ज्यावर चर्चा होणे आवश्यक आहे, पण राजकीय पक्षांच्या दावणीला बांधलेली माध्यमे सुद्धा त्यांच्याच सुरात सूर मिसळताना दिसत असल्याने आता सामान्य जनतेला कोणी वालीच नसल्याची चिन्हे दिसत आहेत, त्यामुळेच या फोडाफोडीच्या धर्मांध राजकारणातून बाहेर पडणे आवश्यक आहे आणि त्यासाठी तरुणाईला आवाज मोठा केला पाहिजे.

म्हणूनच युवकांनो आव्हाने ओळखा आणि सज्ज व्हा. हिंदू मुस्लीम कट्टरता शिकवणाऱ्यांना त्यांच्याच भाषेत सांगा की या देशाने सचिन तेंडुलकर, लता मंगेशकर यांच्यावरही प्रेम केलय आणि अब्दुल कलामांपासून, इरफान खान, दिलीप कुमारांच्याही कामाचा तितकाच गौरव केलाय. देशात आजपर्यंत कधीच कुणाचे हिंदुत्व धोक्यात नव्हत आणि कधी आम्हाला, अगदी आमच्या बाप जाद्यांनाही मुस्लिम बांधवांच्या भोंग्याचा त्रास झाला नाही. पण जेव्हा जेव्हा त्यांच राजकारण धोक्यात आलय तेव्हा तेव्हा त्यांनी धर्माला पुढे केलय. बर ह्या सगळ्या परिस्थितीला फक्त राजकीय नेतेच जबाबदार आहेत असही म्हणता येणार नाही. त्यांचा हा आवाज वाढायला आपलाच निर्बुद्धपणा जबाबदार आहे.

हार मानलेल्या सैनिका प्रमाणे आपण डोळ्यासमोर उध्वस्त होणार भविष्य पाहून आजिबात चालणार नाही. ही सगळे आव्हाने, संकटे आपल्याला तितक्याच ताकदीने परतवून लावायची आहेत. त्यामुळे सज्ज व्हा, येणारी आव्हाने ओळखा, त्यांच्या कुरघोड्या ओळखा आणि हिमतीने लढा द्या. लक्षात ठेवा आपण शिवराय, शंभूराजे, सावित्रीबाई आणि आंबेडकरांचा वारसा सांगणारे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे आपला लढाही तितकाच जोरदार असणार आहे, कारण या मातीचा इतिहासच सांगतो, इथ सगळ परिस्थितीवर रडून नाही तर धैर्याने लढून आणि झगडूनच मिळवायला लागत. त्यामुळेच येणाऱ्या पिढीला धर्मनिरपेक्ष, विविधतेने नटलेला, एकतेचा संदेश देणारा भारत दाखवायला ही लढाई लढावीच लागेल. बस इतकच.

# रॉबर्ट ग्रब्ज - हरितरसायनशास्त्रात महत्वपूर्ण योगदान



प्रा. शहाजी मोरे

रसायनशास्त्र व रासायनिक उद्योगधंद्यांमुळेच मानवाने आजपर्यंत भौतिक प्रगती केली आहे व विकास साधला आहे. सर्वच नवनवीन गोष्टींसाठी नवनवीन पदार्थ निर्माण करावे लागतात, त्यांच्यामध्ये सुधारणा, बदल घडवून आणावे लागतात. नवनवीन औषधे शोधावी लागतात, निर्माण करावी लागतात. भौतिक सुखासासाठी लागणाऱ्या असंख्य वस्तू, पदार्थ व आरोग्यासाठी औषधे रासायनिक प्रक्रियांमुळेच निर्माण करता येतात.परंतु रासायनिक निर्मिती म्हणजेच प्रदूषण, पर्यावरणाची हानी! त्यामुळेच रसायनशास्त्रास 'करडे रसायनशास्त्र' (ग्रे केमिस्ट्री ) असे म्हणतात.

मानवाच्या सुखसोयींच्या अतिरेकी हव्यासामुळे रासायनिक उद्योगधंदे भरभराटीस आले आणि प्रदूषणाने परिसीमा गाठली. इतकी की सध्या पृथ्वी व पृथ्वीवरील सजीव सृष्टी होरपळून निघत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे वातावरणात अनिष्ट बदल घडून येत आहेत. त्याचे दुष्परिणाम मानव व सर्वच सजीव भोगत आहेत. या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी या रसायनशास्त्रास व रासायनिक उद्योगधंद्यांना कमी प्रदूषणकारी करण्यासाठी ज्या रसायनशास्त्रज्ञांनी संशोधन सुरु केले त्यातील एक प्रमुख अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ रॉबर्ट ग्रब्ज यांचे नुकतेच निधन झाले

रॉबर्ट ग्रब्ज यांचे संशोधन प्लॅस्टिकपासून औषधांपर्यंत अनेक पदार्थ बनविताना जे अनेक घातक पदार्थ निर्माण होतात त्यांची निर्मिती टाळणे किंवा ते कमी प्रमाणात निर्माण होतील अशा हरित रसायनशास्त्राच्या तत्वानुसार पद्धती शोधण्यात सहाय्यभूत ठरले व त्यामुळेच त्यांना रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले.

मेटॅथिसीस प्रथम शोधले गेले ते १९५० च्या दशकात! परंतु ते नेमके कसे घडते हे १९७१ पर्यन्त ज्ञात नव्हते. १९७१ मध्ये फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ इव चौवीन व त्यांचे विद्यार्थी जीन - लुईस हॅरिसन यांनी ते स्पष्ट केले. त्यांनी धातूयुक्त - कार्बनी उत्प्रेरक ( मेटल कार्बन कॅटॅलिस्ट) रासायनिक अभिक्रियेतील रेणूच्या भागाशी किंवा तुकड्याशी कसा बद्ध होतो व तात्पुरता रासायनिक बंध (केमिकल बाँड) कसा निर्माण होतो याचा अभ्यास केला. हा रासायनिक बंध आणखी एका रेणूच्या जोडीशी बद्ध होतो व रेणूंचे एक वेटोळे किंवा कडे (रिंग ) तयार होते. (म्हणजे दोन नर्तक आपले चार हात मोकळे करून आणखी दोघा नर्तकांचे हात धरून मानवी कडे करतात तसे.) नंतर हे रेण्वीय कडे तुटते व धातुयुक्त कार्बन उत्प्रेरक रेणूंच्या नंतरच्या जोडीबरोबर राहतो व दोन कार्बन अणूंमधील बंधांची पुनर्बांधणी करतो किंवा नव्याने बंध निर्माण करतो. हीच ती स्थानबदल किंवा मेटॅथिसीस प्रक्रिया! या प्रक्रियेद्वारा अनेक रासायनिक पदार्थ बनविले जातात, ज्यांचा उपयोग दैनंदिन जीवनात उपयोगी अनेक पदार्थांच्या, औषधांच्या निर्मितीसाठी होतो.

स्थानबदल किंवा मेटॅथिसीस प्रक्रिया शोधली त्या प्रारंभीच्या काळात जी काही धातुयुक्त कार्बनी उत्प्रेरके वापरली जात होती ती हाताळण्यास किंवा वापरण्यास सहज साध्य व सुलभ नव्हती , शिवाय ती अस्थिर (अनस्टेबल) असत. १९९० मध्ये मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी( एम. आय. टी.) येथील रिचर्ड श्रॉक यांनी टंगस्टन व मॉलिब्डेनम या धातूंनी युक्त कार्बनी उत्प्रेरकांचा शोध लावला, ती विकसित केली व मेटॅथिसीसचा मार्ग काहीसा मोकळा केला. ही उत्प्रेरके कार्यक्षम होती परंतु त्यांचा हवेशी संपर्क आल्यानंतर त्यातील कार्बन व धातू वेगळे होतात व उत्प्रेरके निष्क्रिय होतात.

रॉबर्ट ग्रब्ज हे १९७० पासून स्वतंत्रपणे मेटॅथिसीसवर संशोधन करीत होते. १९९२ मध्ये त्यांनी रुथेनियम धातू असलेली उत्प्रेरके विकसित केलेली होती. ही उत्प्रेरके श्रॉक यांनी मिळविलेल्या उत्प्रेरकांइतकी कार्यक्षम नव्हती परंतु हवेशी संपर्क आला तरी ती स्थिर होती व निष्क्रिय होत नव्हती. याउलट श्रॉक यांनी मिळविलेली उत्प्रेरके होती. त्यामुळे मेटॅथिसीसच्या मार्गातील कोंडी सुटली होती. पुढे ग्रब्ज यांनी हे उत्प्रेरके आणखी कार्यक्षम कशी करता येतील याविषयी संशोधन केले. हरित रसायनशास्त्रासाठी ही एक महत्वाची पायरी ठरली आहे.

श्रॉक व ग्रब्ज यांचे संशोधन म्हणजे रासायनिक पदार्थांच्या उत्पादन प्रक्रियेत एक मैलाचा दगड !त्यांनी विकसित केलेली उत्प्रेरके 'ग्रब्ज उत्प्रेरके' व 'श्रॉक उत्प्रेरके' म्हणून ओळखली जाऊ लागली व सध्या अनेक रासायनिक पदार्थांच्या निर्मितीमध्ये वापरली जातात. याशिवाय अशा उत्प्रेरकांचे अनेक फायदे आहेत. या उत्प्रेरकांचे रासायनिक अभिकियेनंतर किमान मात्रेत टाकाऊ पदार्थ विशेषतः घातक टाकाऊ पदार्थ निर्माण होतात. अशा उत्प्रेकांच्या निर्मितीसाठी व विकासासाठी रॉबर्ट ग्रब्ज, इव चौवीन व रिचर्ड श्रॉक या तिघांना २००५ साली रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नोबेल पारितोषिकासाठी शास्त्रज्ञांची निवड समितीने 'या तिघा शास्त्रज्ञांचे संशोधन हे घातक टाकाऊ पदार्थांची किमान प्रमाणात निर्मिती व अपेक्षित पदार्थांची उत्कृष्ट निर्मिती साध्य करू शकणारे संशोधन असून हरित रसायनशास्त्राच्या प्रगतीसाठी एक मोठे पाऊल आहे', अशा शब्दांत गौरव केला.

रॉबर्ट ग्रब्ज यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९४२ रोजी केंट्युकी या अमेरिकेतील प्रांतात झाला . लहानपणापासूनच विज्ञानाची आवड असलेल्या ग्रब्ज यांनी कृषिरसायनशास्त्र (ॲग्रोकेमिस्ट्री) या विषयात फ्लोरिडा विद्यापीठाची पदवी संपादित केली. पशुसंवर्धन केंद्रातील प्राण्यांच्या शेणाचे विश्लेषक म्हणून काम करीत असतानाच एका मित्राकडून मार्ले बॅटिस्टे या संशोधकाच्या सहाय्यकपदी काम करण्याबाबत विचारण्यात आले व त्यांनी ते पद स्विकारले. त्याकाळी ग्रब्ज ई.एम.गौल्ड यांचे, 'मेकॅनिझम अँड स्ट्रक्चर्स इन ऑरगॅनिक केमिस्ट्री' हे सेंद्रिय रसायनशास्त्रातील अभिक्रिया कशा घडतात हे विशद करणारे पुस्तक वाचनात रमून जात. या पुस्तकामुळे त्यांनी रसायनशास्त्रात संशोधन करण्याचे निश्चित केले. ( सर्व विज्ञान शाखा महाविद्यालयांमध्ये हे पुस्तक असतेच.) त्यात भर म्हणजे ऑस्ट्रेलियन रसायनशास्त्रज्ञ रौलँड पेटीट यांच्या एका व्याख्यानाने ते धातूंचा उपयोग सेंद्रिय रसायनशास्त्रात करण्यास प्रेरित झाले व त्या प्रवासाने त्यांना नोबेल पारितोषिक मिळवून दिले.

१९९८ मध्ये त्यांनी पीएच. डी. पश्चात संशोधन करणारे संशोधक ( पोस्ट डॉक फेलो) माईक गियार्डेल्लो यांच्यासमवेत ग्रब्ज उत्प्रेरके निर्माण करण्याचे खास हक्क असलेली मटेरिया नावाचा उद्योग (कंपनी) पॅसाडिना येथे उभारला. नोबेल पारितोषिकाशिवाय त्यांना अनेक महत्वाचे पुरस्कार व अनेक संशोधन संस्थांनी सदस्यपदे प्रदान केली.

'ग्रब्ज हे मानवी मुल्ये व दिशादर्शी संशोधनामुळे जगभरच्या शास्त्रज्ञांचे प्रेरणास्थान होते त्यांची दूरदृष्टी व विद्वत्तेस आपण मुकलो आहोत', अशा शब्दांत कॅलिफ़ोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ़ टेक्नॉलॉजी (कॅल टेक) चे प्रमुख थॉमस रोझेनबाऊम यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.


# तांदळाचे अप्पम

**साहिल शिकलगार**



साहित्य - अडीच कप तांदूळ , ४०० मिली. नारळाचं दूध, पाऊण कप पाणी, एक कप शिजवलेला भात आणि चवीनुसार मीठ आणि यीस्ट मिश्रण तयार करण्यासाठी एक छोटा चमचा ऐक्टिव ड्राय यीस्ट, अर्धा चमचा साखर, ३ चमचे गरम पाणी.

कृती- आधी तांदूळ पाच सहा तास पाण्यात भिजत घालावेत. त्यानंतर यीस्टचं मिश्रण तयार करावं. एका भांड्यात यीस्ट मिश्रणाचं सर्व साहित्य घालून ठेवावं. ते पाच दहा मिनिटं तसंच ठेवावं. मग त्यामध्ये बुडबुडे येतात. नारळाचं दूध, भिजवलेले तांदूळ , शिजवलेला भात आणि पाणी घालून ते वाटून घ्यावेत. मिश्रण चांगलं सरसरीत करावं. यात यीस्टचं मिश्रण घालावं. हे मिश्रण आठ ते बारा तासांसाठी आंबवायला ठेवावं. ते आंबवतानाच त्यात मीठ घालावं. सकाळी नाश्त्यासाठी किंवा संध्याकाळी स्नॅक्स म्हणूनही करता येतात. डोशाच्या तव्यावर ते करावेत. ते भाजताना तेल किंवा बटर वापरु शकतो . हे पॅनकेक अवघ्या एक दोन मिनिटात तयार होतात. अप्पमचं पीठ तयार करून फ्रीजमधे ठेवून बरेच दिवस वापरता येतं.



आडवे शब्द - १) जोशपूर्ण; स्पुर्तिदायक ४) मेंढीच्या अंगावरील केस ७) एकरूप; नम्र ८) गोंधळ आरडाओरडा १०) एक विषारी साप ११) अस्वस्थता १२) एक दुग्धजन्य पदार्थ १३) काही अटींचे पालन व बाकी व्यवहारात मात्र स्वतंत्रता असा बंदीवास १६) विजयी १८) हेडसांड २०) हिंदीत ओळ, रांग २१) कैफ २३) अफुचे बी २५) हृदय २७) केवळ २९) चपट्या नाकाचा ३०) उत्तराधिकारी ३१) कृष्णाची पोष्य माता ३२) रघुनंदन ३४) 'आत्ता' चा हिंदी उच्चार ३५) तणावमुक्त खुशाल सुखी निरोगी ३६) लक्ष्मी३८) मातीचा लहान दिवा ४०) एनवेळी पहिल्यांदा विरुद्ध बोलणार ४२) लोकमत ४६) फळातील द्रव भाग ४७) अधिकार ४८) सरपटणारा एक शक्तिशाली प्राणी

उभे शब्द -

१) सिंचन सुविधा असलेली जमीन २) खानेसुमारी ३) सिंहिणीच्या स्वरुपात तिचा नवजात छावा ४) लोंढा ५) सौंदर्य ६) मृत्यु ८) अंतराळ ९) एक पक्षी १४) यात्रेकरूंचा मेळावा १५) वैकुंठ १७) लाज १८) एक श्वासरोग १९) ठिकाण २०) कसरतीत प्रावीण्य मिळविणारा २२) आकर्षक २३) एक वाहन २४) एक दुग्धजन्य पदार्थ २६) मुखवटा२८) तटस्थ ३३) भूंगा ३४) अतिशय ३५) पण पूर्ण करणाऱ्याला मुलीने वरन्याची जुनी प्रथा ३७) संपत्ती ३९) झोंबाझोंबी ४१) सेना ४३) हाताची नाडी ४४) हत्तीचे नाक ४५) आग.

## 'मनी पांडुरंग ज्ञानी पांडुरंग'

**प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे**

प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड हे मोठे तरतरीत आणि रुबाबदार व्यक्तिमत्व आहे. किंबहुना उदंड उत्साहाचे दुसरे नाव 'प्राचार्य डॉक्टर पांडुरंग गायकवाड' हे आहे. वारकरी संप्रदायाचा तीन पिढ्यांचा वारसा त्यांच्या नावातून झळकतो आहे. आता ते रयतेच्या ज्ञान पंढरीचे पांडुरंग आहेत. माझे ज्ञानमित्र आहेत. प्राचार्य गायकवाड यांच्या महाविद्यालयावर व्याख्यानासाठी जाण्याचा तीन वेळा योग आला.तो ज्ञानयोग होता. मंचरच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात दोनदा आणि पिंपरीच्या महात्मा फुले महाविद्यालयात एकदा. वार्षिक अंक प्रकाशन, स्नेहसंमेलन आणि कर्मवीर अण्णांची जयंती..

अशी काही व्याख्यानांची निमित्त होती.. पण या निमित्ताने त्यांचा जो स्नेहबंध जुळला, तो वाढतच राहिला. पुढे पुढे तो बळकट झाला आणि आमच्या मैत्रीच्या वेलीवर भक्तिभावाची सुवासित फफ़ुले उमलली. प्राचार्य गायकवाड यांचे मनोहर व्यक्तिमत्व ज्यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे, त्यांना त्यांची रसिकता आणि गुणवत्ता लक्षात येईल. प्राचार्य गायकवाड मध्यंतरी वर्षभरापुरते सातारा जिल्ह्यातील उंब्रजच्या सौ एम आर जगताप महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत होते. मला वाटते ते २०१३-१४ शैक्षणिक वर्ष अ, मी शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्य होतो.

माझ्या महाविद्यालयातील एका अभ्यासक्रमाला मान्यता देण्याच्या समितीवर शिवाजी विद्यापीठाने त्यांना चेअरमन म्हणून पाठवले होते .माझ्या या ज्ञानसख्याचे माझ्याच महाविद्यालयावर स्वागत करताना माझे मन आनंदाने भरून आले होते. आमचा मैत्रभाव घट्ट होताच..तो आणखीन घट्ट झाला. ह्या पांडुरंगाला वयोमानाच्या बंधनामुळे नोकरी व्यवसायातून निवृत्त व्हावे लागते आहे.

असे असले तरी त्यांची शब्दसेवा सेवानिवृत्तीनंतरही अखंड सुरूच राहणार आहे. आपण आमच्या मनी वसलेल्या ह्या ज्ञानी पांडुरंगाला जीवनाचे मंगलगाणे गाण्यासाठी उदंड आणि उत्तम आयुआरोग्य द्यावे.

## बँकांचे आरबीआई च्या पावलावर पाऊल

**संजना बंडी**

नवी दिल्ली : बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ इंडियाने नवीन कर्जावरील व्याजदरात ४० बेस पॉईंटने वाढ केली आहे. भारतीय रिजर्व बँकेने रेपो दरात अशीच आश्चर्यकारक वाढ केली आहे. ज्या ग्राहकांनी बाह्य बेंचमार्कशी निगडित कर्जाचा लाभ घेतला आहे अशा ग्राहकांना सर्व बँका आपोआप संपूर्ण रेपो दर वाढ देतील.

बँकेने आपल्या वेबसाइट वर पोस्ट केली आहे की त्यांचा बाह्य बेंच मार्क कर्ज दर


( EBLR ) ७.७०%, ८.१०% पर्यंत वाढवला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ बडोदा ने त्यांच्या वेबसाइटवर घोषणा केली आहे '५ मे २०२२२ पासून, किरकोळ कर्जासाठी संबंधित बडोदा रेपो लिंकड लेडिंग रेट ६.९% आहे.' असे त्यात म्हटले आहे. पूर्वी तो ६.५० % होता.

बँक ऑफ इंडिया ने स्टॉक एक्सचेंजला दिलेल्या अधिसूचनेत म्हंटले आहे की - बँकेच्या बोर्डाने मंजूर केलेल्या किंमत धोरणानुसार बँकेचा ४ मे २०२२ पासून ७.२५ % इतका बदलला गेला आहे. पूर्वी तो ६.८५ % होता.

## महात्मा फुले महाविद्यालयातील शिक्षकांची उल्लेखनीय कामगिरी



प्रा. डॉ. दत्तात्रय हिंगणे (रसायनशास्त्र)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता



प्रा. डॉ. संगीता अहिवळे (जीवशास्त्र)
- डॉ. एलिझाबेथ मार्टिन कुटर इंटरनेशनल यंग सायंटिस्ट अवॉर्ड २०२१- २२



प्रा.डॉ.निलकंठ डहाळे (इंग्रजी)
Down to the Earth from sky above.
या पुस्तकाचे लेखन




प्रा.डॉ.मृणालिनी शेखर (इंग्रजी)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची इंग्रजी विषयाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता



प्रा. संदिप ननावरे (इतिहास)
- पुस्तके प्रकाशित - १)महात्मा गांधी दलित्तोधार चळवळ : वास्तव आणि भ्रम २)भारतीय राष्ट्रीय चळवळ व स्वातंत्र्योत्तर भारत



प्रा. डॉ. पांडुरंग भोसले (मराठी)
- आदिवासी साहित्य संकल्पना स्वरूप व वाटचाल या पुस्तकाचे सहलेखन



प्रा.डॉ.वैशाली खेडकर (हिंदी)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची हिंदी विषयाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता



सौ. रूपाली शेळके (इंग्रजी)
सेट नेट परीक्षा उत्तीर्ण




प्रा. संग्राम सीताराम गोसावी (मराठी)
- नेट परीक्षा उत्तीर्ण



प्रा. दत्तात्रय बिडबाग (मास कम्युनिकेशन)
- सेट परीक्षा उत्तीर्ण

## वाढते तापमान ठरतेय शेतीसाठी डोखेदुखी?

**विशाल बोदगे**



मुंबई :भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार एप्रिल महिन्याचा शेवट आणि मे महिन्याची सुरवात रखरखत्या उन्हाने झालेली आहे. यावर्षी जगातील सर्वच देशांना या वाढत्या गर्मीचा त्रास होत आहे.

उन्हाची तीव्रता अजून वाढणार असून ती मानवी सहनशक्तीच्या पलीकडे जाईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या वाढत्या तापमानाचा मोठा परिणाम शेतीवर होत असल्याचे दिसत आहे.

लॅन्सेट या मासिकात प्रसिद्ध झालेल्या ताज्या लेखाप्रमाणे तीव्र उन्हाचा मनुष्याच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम झाला आहे त्यामुळ येत्या कालावधीमध्ये उन्हाळ्याची तीव्रता अशीच राहिली तर शेती उत्पादनामध्येही घट होईल अशी शंका निर्माण झाली आहे.

लॅन्सेट मासिकातील माहितीनुसार, २०१८ या एका वर्षामध्ये वाढत्या उन्हामुळे तब्बल एकशे पन्नास अब्ज मनुष्य तासांचे नुकसान झाल. या काळामध्ये जेवढे उत्पादन शक्य होते तेवढे उत्पादन मिळालं नाही. जगभरातील देशांच्या अन्नधान्याची गरज भागवणारे जे शेतकरी आहेत त्यांच्या उत्पादन क्षमतेवर या उन्हाचा परिणाम होणार आहे. येत्या काळात अन्नधान्याच्या उत्पादनातही लक्षणीय घट होईल अशी भीती या लेखात व्यक्त करण्यात आली आहे.

आता तीव्र होत असलेल्या उन्हामुळे लोकांना घराबाहेर जाऊन काम करणे शक्य होत नाही. याचा परिणाम उत्पादन क्षमतेवर होणार आहे. मोठ्या प्रमाणावर वनीकरणाची मोहीम राबवून जर हिरवाई निर्माण केली नाही तर २०३० पर्यंत जगातील मोठ्या लोकसंख्येला तीव्र दुष्काळाचा सामना करावा लागेल असाही इशारा या लेखात देण्यात आला आहे.

## आनंदाची बातमी! यंदा १० दिवस अगोदरच होणार पावसाचे आगमन, पाहा मुंबईत कधी दाखल होणार मान्सून?

**प्रिया कांबळे**

मुंबई :सध्या सर्वच देशांना उन्हाचा तडाखा बसत आहे. उन्हामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होताना दिसत आहेत. अशातच आता एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. ती म्हणजे यंदा मान्सून भारतात १० दिवस आधीच दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. 'युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर' या संस्थने ही माहिती दिली आहे. २० किंवा २१ मे रोजी मान्सून अंदमानात दाखल होणार असल्याची माहिती समोर आली आहे, त्यामुळे आता लवकरच उष्णतेच्या झळामधून नागरिकांची सुटका होणार आहे.

'युरोपियन सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर'च्या माहितीनुसार, २० ते २१ मे रोजी मान्सून अंदमानात तर २८ ते ३० मे पर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होणार आहे. गतवर्षी केरळमध्ये १ जूनला पावसाचे आगमन होण्याची शक्यता वर्तवली होती. परंतु चक्रीवादळामुळे केरळमधील मान्सूनचे आगमन ३ जूनपर्यंत लांबणीवर गेले होते. त्यामुळे आतादेखील सर्व परिस्थिती सुरळीत राहिल्यासच मान्सून २८ मे पर्यंत केरळमध्य दाखल होईल. त्यानंतर मान्सून भारताच्या इतर भागांच्या दिशेने



जाईल.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानत प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. महाराष्ट्रतील काही भागांमध्ये गेल्या १२२ वर्षांतील उच्चांकी तापमानाची नोंद झाली आहे. उन्हाचा चटका वाढल्याने अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई भासत आहे. तसेच पिकांनाही पाण्याची गरज आहे, त्यामुळे अशा काळातच पाऊस पडणार असल्याने दिलासा मिळणार आहे.

मान्सून ७ जूनपर्यंत तळकोकणात दाखल होऊ शकतो तर त्यानंतर चार दिवसांत म्हणजे ११ जूनपर्यंत मान्सून मुंबईत दाखल होऊ शकतो. यंदा सर्वसाधारण पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. जून महिन्यात कमी पाऊस, जुलै महिन्यात साधारण पाऊस तर ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

# तब्बल दोन वर्षानंतर नेहमीसारखी होणार आषाढीवारी

**कीर्ती पटवर्धन**



आषाढी वारीसाठी ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यची कार्यक्रमपत्रिका जाहीर, वाचा सविस्तर

कोरोनाच्या दोन वर्षांत कोरोनाच्या संकटानंतर यंदा पंढरपूरची आषाढी वारी पुन्हा एकदा होणार आहे. गेली दोन वर्षे कोरोनामुळे विविध प्रकारची बंधने वारीवर आली होती. एसटीने संतांच्या पादुका पंढरपुरात नेल्या जात होत्या. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आषाढी पायी वारीसाठी २१ जून रोजी आळंदीतून पंढरपूरकडे प्रस्थान करेल.

एप्रिलमध्ये श्रीक्षेत्र पंढरपूर येथील संत ज्ञानेश्वर महाराज मठात आषाढी वारी पायी दिंडी पालखी सोहळा नियोजनाची बैठक पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पायी पालखी सोहळ्याबाबत सर्व निर्णय घेण्यात आले आहेत.

पालखी सोहळ्यासोबत वारीत सहभागी वाहनांना पोलिसांकडून परवाने (पास) दिले जाणार आहेत. फक्त परवानाधारक वाहनांनाच पालखी सोहळ्यासोबत वारीत सहभागी होता येणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात रथापुढे २७ आणि रथामागे २५१ नोंदणीकृत दिंड्या असणार आहेत. नोंदणी नसलेल्या आणखी १२५ ते १५० दिंड्याही पालखी सोहळ्यात सहभागी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलीस परवानगी आणि पालखी सोहळा संस्थानशी समन्वय साधून या दिंड्या सहभागी होणार आहेत.

आषाढी वारीसाठी माउलींच्या पालखीचं प्रस्थान २५ जूनला आळंदीहून होईल. २८ जूनला पालखी पुण्यात मुक्कामी असेल. शुक्रवारी दिवेघाट मार्गे सासवडला जाईल. ०१ जुलै जेजुरी, ०१ जुलै वाल्हे, लोणंद, ०३ जुलै तरडगाव, ०५ जुलै फलटण,०६ जुलै बरडै, नातेपुते, ०७ जुलै माळशिरस,०८ जुलै वेळापूर,०९ जुलै भंडीशेगाव, १० जुलै वाखरी तर १६ जुलैला पंढरपूरला मुक्कामी पोहचेल.

रविवारी (१६ जुलै) रोजी आषाढी एकादशीचा महासोहळा पंढरपूर येथे पार पडणार आहे. यंदाच्या वारीसाठी लाखो वारकरी उत्साही असल्याचे दिसत आहे. पालखी सोहळ्यात चांदोबाचा लिंब, बाजीराव विहीर व इसबावी येथे उभे रिंगण, तर पुरंदावडे ( सदशिवनगर), पानीव पाटी, ठाकूरबुवा व बाजीराव विहीर येथे अश्वांचे गोल रिंगण होणार आहे.

### संत ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी वेळापत्रक


| तिथी | तारीख | वार | पहिली विश्रांती | दुपारचा विसावा | रात्रीचा मुकाम |
|---|---|---|---|---|---|
| ज्येष्ठ वद्य ८ | २५ जून | मंगळवार | -- | प्रस्थान सायं ४ वा. | आजोळघर, आळंदी |
| ज्येष्ठ वद्य ९ | २६ जून | बुधवार | आळंदी | फुलेनगर | पालखी विठोबा मंदिर भवानी पेठ, पुणे |
| ज्येष्ठ वद्य १० | २७ जून | गुरुवार | -- | -- | पुणे |
| ज्येष्ठ वद्य १० | २८ जून | शुक्रवार | पुणे | उरुळी देवाची | सासवड |
| ज्येष्ठ वद्य ११ | २९ जून | शनिवार | -- | -- | सासवड |
| ज्येष्ठ वद्य १२/१३ | ३० जून | रविवार | सासवड | यमाई शिवरी | जेजुरी |
| ज्येष्ठ वद्य १४ | १ जुलै | सोमवार | जेजुरी | वाल्हे | वाल्हे |
| ज्येष्ठ वद्य १४ | २ जुलै | मंगळवार | वाल्हे | निरा | लोणंद |
| ज्येष्ठ वद्य १ | ३ जुलै | बुधवार | -- | चांदोबाचा लिंब (उभेरिंगण) | तरडगाव |
| ज्येष्ठ वद्य २ | ४ जुलै | गुरुवार | तरडगाव | निंभोरे ओढा | विमानतळ, फलटण |
| ज्येष्ठ वद्य ३ | ५ जुलै | शुक्रवार | फलटण | पिंपरद | बरड |
| ज्येष्ठ वद्य ४ | ६ जुलै | शनिवार | बरड | धर्मपुरी कॅनॉल, कारूंडे | नातेपुते |
| ज्येष्ठ वद्य ५ | ७ जुलै | रविवार | नातेपुते | मांडवी ओढा (गोलरिंगण) | माळशिरस |
| आषाढ शु. ६/७ | ८ जुलै | सोमवार | खुडूसफाटा (गोलरिंगण) | विझोरी ज्ञानेश्वर नगर | वेळापूर |
| आषाढ शु. ८ | ९ जुलै | मंगळवार | वेळापूर (गोलरिंगण) | तोंडले बोंडले | भंडीशेगाव |
| आषाढ शु. ९ | १० जुलै | बुधवार | -- | भंडीशेगाव (उभे व गोल) | वाखरी |
| आषाढ शु. १० | ११ जुलै | गुरुवार | -- | वाखरी (उभेरिंगण) | पंढरपूर |
| आषाढ शु. ११ | १२ जुलै | शुक्रवार | नगरप्रदक्षिणा | श्रीचे चंद्रभागा स्नान | पंढरपूर |
| आषाढ शु. १५ | १६ जुलै | मंगळवार | श्रीचे चंद्रभागा स्नान श्री विठ्ठल रुक्मिणीभेट | -- | पंढरपूर |
| आषाढ वद्य १ | १७ जुलै | बुधवार | -- | परतीचा प्रवास सुरू | वाखरी |

# सरसेनापती हंबीरराव चित्रपटात स्नेहल तरडे दिसणार महत्वाच्या भूमिकेत

**प्रतिमा औसरमल**

सध्या मनोरंजनविश्वात ऐतिहासिक चित्रपटांचे वारे वाहत आहे. इतिहासातील विविध महत्वाच्या घटनांना चित्रपटाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोचवण्याचे काम अनेक दिग्दर्शक, निर्माते करत आहेत. नुकताच छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य दाखवणारा शेर शिवराज सिनेमा प्रदर्शित झाला. आता लवकरच अभिनेते आणि दिग्दर्शक प्रवीण तरडे यांचा 'सरसेनापती हंबीरराव' हा भव्य सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच सिनेमाचा जबरदस्त टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता या सिनेमातील एक नवीन पोस्टर प्रदर्शित झाले आहे.

अभिनेत्री स्नेहल तरडे या



'सौ. लक्ष्मीबाई हंबीरराव मोहिते' यांची भूमिका साकारणार आहे. छत्रपती ताराराणी यांच्या मातोश्री आणि सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या पत्नीची महत्वाची भूमिका स्नेहल निभावणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज या दोन छत्रपतींच्या काळात स्वराज्याचे सरसेनापती होण्याचा सन्मान मिळालेले एकमेव सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची व्यक्तिरेखा स्वतः प्रविण तरडे साकारणार आहेत. या सिनेमाच्या माध्यमातून एकमेकांचे जीवनसोबती असणारे प्रविण तरडे आणि स्नेहल तरडे हे मोठ्या पडद्यावर देखील एकमेकांच्या सोबत पाहायला मिळणार आहेत.

स्नेहल यांच्याबद्दल सांगायचे झाल्यास त्या प्रवीण तरडे यांच्या पत्नी तर आहेच सोबतच त्या एक उत्कृष्ट अभिनेत्री आणि संवाद लेखिका देखील आहे. त्यांनी अतिशय मानाच्या पुरुषोत्तम करंडकमध्ये देखील सहभाग घेत पारितोषिक पटकावले आहे. रंगमंचासोबतच त्यांनी 'अभिमान' आणि 'तुझं माझं जमेना' या मालिकांमध्ये तर 'शाळा', 'चिंटू', 'चिंटू २', 'देऊळ बंद', 'मुळशी पॅटर्न' या चित्रपटांमध्ये काम केले आहे.

याशिवाय स्नेहल यांनी अनेक काळ पोलीस खात्यात सेवा केली आहे. मराठीत प्रदर्शित झालेल्या 'बाहुबली' आणि 'बाहुबली २' या चित्रपटाचे मराठी संवाद लेखन स्नेहल यांनीच केले.

# सूर्यमालेत दडली आहे आणखी एक पृथ्वी; अमेरिकेच्या खगोल शास्त्रज्ञांना मिळाले संकेत

**शुभम गमरे**

वॉशिंग्टन : सूर्यमालेतच नव्हे, तर आतापर्यंतच्या

ज्ञात विश्वातही सजीव सृष्टी असणारा किंवा सजीव सृष्टीला पोषक वातावरण असणारा एकच ग्रह आहे आणि तो म्हणजे आपली पृथ्वी, आपल्या सूर्यमालेतच आणखी पृथ्वी दडली असून ती शनी या मोठ्या ग्रहाभोवती फिरत आहे. ही पृथ्वी म्हणजे शनीचा उपग्रह टायटन आहे आहे, असा निष्कर्ष वॉशिंग्टन मधील संशोधकांचा आहे.

टायटन या उपग्रहावर पृथ्वीप्रमाणे पाण्याच्या नद्या, जलायश आणि जलस्रोत असल्याचे संशोधनात दिसून आले आहे. शनी या ग्रहाभोवतील असंख्य कडी आहेत. तसेच त्याचे ५० हून अधिक चंद्र किंवा उपग्रह आहेत. टायटन हा त्यापैकी एक असून त्याचा आकार पृथ्वीपेक्षा थोडासा लहान आहे असा अंदाज शास्त्रज्ञांनी सांगितला आहे.

या उपग्रहवर आपल्या पृथ्वी सारखे वातावरण आहे असे सांगण्यात आले. पृथ्वीवर ज्या प्रमाणे ऋतू असतात तसे टायटनवरही आहेत.तसेच समुद्र आहेत. गोडे पाणीही असू शकते. मात्र, येथील जलाशयांमध्ये पृथ्वीवरील जलाशयांपेक्षा वेगळ्या प्रकारची खनिज द्रव्ये आहेत. येथे द्रवरूप मिथेनचे प्रमाण फार मोठे आहे. या मिथेनचा पाऊस येथे पडतो व नायट्रोजन चे वारे वाहतात असे म्हटले आहे.

मुख्य प्रश्न या उपग्रहावर जीवसृष्टी आहे काय आणि असल्यास कोणत्या स्वरूपातील? हा प्रश्न शोधून काढण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ करत आहेत.हा उपग्रह सूर्यापासून इतका दूर आहे की तेथे अतिशय अंधूक सूर्यप्रकाश पडतो. इतक्या कमी सूर्यप्रकाशात आपल्या पृथ्वीप्रमाणे समृह आणि विविधांगी जीवसृष्टी अस्तित्वात येऊ शकत नाही. मात्र, येथे तीव्र थंडी आणि मिथेनच्या वातावरणात तग धरू शकणारे अतीसूक्ष्म जीवाणू असू शकतात. भविष्यात कधीतरी... आजपासून अब्जावधी वर्षांनंतर सूर्याचा आकार वाढून त्याची उष्णताही वाढल्यानंतर या उपग्रहावर पुरेशा प्रमाणात उष्णता पोहचून तेथे अधिक प्रगत जीवसृष्टी निर्माण होऊ शकते, असे संशोधकांचे मत आहे. मात्र, या जीवसृष्टीचा पृथ्वीशी संपर्क येणे मात्र संभवत नाही, असे संशोधक म्हणत आहेत.

# रोहित, विराटला टी२० विश्वचषकातून मिळणार डच्चू?

**श्वेता चिदमलवाड**

भारतात सध्या इंडियन प्रीमियर लीगच्या पंधराव्या हंगामाचा थरार सुरू आहे. अनुभवी आणि नव्या दमाचे खेळाडू आयपीएलमध्ये आपले सर्वश्रेष्ठ प्रदर्शन करत येत्या टी२० विश्वचषकासाठी आपला दावा ठोकत आहेत. याचवर्षी ऑस्ट्रेलियामध्ये १६ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर दरम्यान टी२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. त्याचदृष्टीने यावर्षीची आयपीएल महत्वाची असून यातून अनेक खेळाडू छाप पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, भारतीय संघव्यवस्थापनाला आणि निवडकर्त्यांना विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या फॉर्मची सर्वाधिक चिंता वाटत आहे.

टी२० विश्वचषक २०२२ स्पर्धेसाठी संभावित भारतीय संघातील खेळाडूंच्या तुलनेत विराट कोहली आणि रोहित शर्मा यांची कामगिरी खुपच खालवलेली दिसून येत आहे. त्याचमुळे आता त्यांच्या भारतीय संघातील स्थानाबद्दलही प्रश्न उपस्थित राहू लागले असून त्यांना विश्रांती देण्याचाही सल्ला अनेक दिग्गजांनी दिला आहे.

गेल्या ६ महिन्यातील कामगिरीबद्दल बोलायचे झाल्यास, रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १७ सामन्यांत ३३.५० च्या सरासरीने ६०३ धावा केल्या आहेत. यात ५ अर्धशतकांचा समावेश आहे. तसेच विराटने १६ सामन्यांत २८.८८ च्या सरासरीने ४९१ धावा केल्या आहेत. त्याच्या ४ अर्धशतकांचा समावेश आहे. त्यांच्यापेक्षा या काळात श्रेयस अय्यर, रिषभ पंत, केएल राहुल या खेळाडूंनी अधिक धावा



केल्या आहेत.

तसेच आयपीएल २०२२ मध्ये तर या दोन्ही खेळाडूंची कामगिरी आणखीनच खालावलेली दिसते. आयपीएलचे जवळपास ४० सामने खेळून झाले तरी, हे दोघेही पहिल्या १० काय, तर पहिल्या २० फलंदाजांच्या यादीतही दिसत नाहीयेत. रोहितने ९ सामन्यांत १५५ धावा आणि विराटने १० सामन्यांत १८६ धावा केल्या आहेत. दोघांचीही सरासरी २१ पेक्षाही कमी आहे. अद्याप रोहितला साधे एक अर्धशतकही करता आलेले नाही, तर विराटने ९ सामन्यांनंतर अखेर १०व्या सामन्यात अर्धशतक केले आहे.

ही कामगिरी पाहाता त्यांना फक्त अनुभवाच्या जोरावर टी२० विश्वचषकासाठी स्थान मिळणार का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

रोहितने आयपीएलमध्ये कर्णधार म्हणून मोठे यश मिळवले आहे. तो आयपीएलमध्ये सर्वाधिक ५ वेळा विजेतपद मिळवणारा कर्णधारही आहे. मात्र, त्याच्याच नेतृत्वाखाली आयपीएलच्या १५ व्या हंगामात मुंबई इंडियन्स पहिले

आठही सामने पराभूत झाली आहे. त्याचमुळे आता असाही सूर ऐकू येत आहे, की रोहितला कर्णधार म्हणून जे यश मिळाले, त्यात कुठेतरी मुंबई संघात असलेल्या अनेक दिग्गज खेळाडूंचा अर्थात एका तगड्या संघाचाही मोलाचा वाटा राहिला. पण आता, जेव्हा संघ अडचणींचा सामना करत आहे, तसेच संघात अनुभवाची कमी दिसत आहे, तेव्हा रोहितच्या नेतृत्वात कमजोरी दिसत आहे.

महत्त्वाचे म्हणजे टी२० क्रिकेटला झटपट खेळ आणि यश महत्त्वाचे असते. विराट आणि रोहित गेल्या काही महिन्यांत याचबाबतीत मागे पडत असल्याचे दिसत आहे.

आता सचिन-द्रविड-गांगूलीप्रमाणे रोहित-विराटचीही गत झाली आहे. बाकी टी२०मध्ये तर भारतीय संघात येण्यासाठी अनेक युवा खेळाडू तयार आहेत. अगदी प्रत्येक जागेसाठी ३-४ खेळाडू तयार आहेत. अशावेळी विराट-रोहितचा पुर्व इतिहास महत्त्वाचा की, आताचा फॉर्म? हा निर्णय निवड समितीला घेणे कठीण जाणार आहे. तसेच एकप्रकारे योग्यता असूनही युवा खेळाडूंना संधी न देणे म्हणजे एकप्रकारचा अन्यायच असेल.

# रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना घवघवीत यश!

महाविद्यालयाचे अनेक खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य स्पर्धेमध्ये यश संपादन करत असतात. या शैक्षणिक वर्षामध्ये बेंगलोर येथे झालेल्या खेलो इंडिया यूथ गेम्स स्पर्धे त कु. शुभम धायगुडे याने जलतरण स्पर्धेमध्ये १५०० मी. फ्रीस्टाइल या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक संपादन केले. कु. स्नेहल खवरे हिने जुदो स्पर्धेत ५२ कि. वजन गटात रजत पदक संपादन केले तर




रायफल शूटिंग स्पर्धेत सांघिक क्रीडा प्रकारात कु. अथर्व मगर याने रजत पदक संपादन केले आहे. तसेच स्वाती जाधव हिने हॉकी मध्ये सहभाग नोंदविला आहे. या वर्षी महाविद्यालयाचे एकूण १५ खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग घेतला आहे. विविध स्पर्धेमध्ये भाग घेऊन एकूण ३५ खेळाडूंनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेत यश संपादन केले. या सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. पांडुरंग गायकवाड व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पांडुरंग लोहोटे व महाविद्यालयातील सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन मिळाले.



छायांकन-प्रसाद ठाकूर

# घनदाट जंगलात पोहचून दिली दुर्गम भागात आरोग्य सेवा ; गडचिरोलीतील डॉक्टरांचा आदर्श उपक्रम...

**निकिता देशमुख**

गडचिरोली:- ज्या दुर्गम भागातील नागरिकांना खाण्यासाठी अन्न मिळणेही कठीण आहे, तिथे आरोग्य सुविधा कशी पोहोचणार? पण गडचिरोलीतील डॉक्टरांनी सामाजिक बांधिलकी जोपासत त्यांच्यापर्यंत विनामूल्य आरोग्य सेवा पोहोचविली. केवळ तपासणी आणि रोगनिदानच नाही तर शक्य तो उपचार आणि औषधोपचारही केले. शहरातील खासगी डॉक्टरांचा हा स्तुत्य उपक्रम आदर्श ठरला आहे.

याच वर्षी नाही तर गेल्या १० वर्षांपासून जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम बिनागुंडा या गावात अशा पद्धतीने ते आरोग्य सेवा देत आहेत. यावेळी संपूर्ण आरोग्य तपासणी, औषधींचे वाटप, रक्तघटक तपासणी, वस्त्रदान, दैनंदिन जीवनावश्यक वस्तू वितरण, मच्छरदाणी वाटप, अन्नदान आदी उपक्रम राबविले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल रुडे यांनी आवश्यक औषधसाठा उपलब्ध करून दिला.

बिनागुंडा,फोदेवाडा, तुर्रेमर्का, कुवाकोडी, गुंडेनूर या गावातून जवळपास ३५० ते ४०० लोकांनी या आरोग्य मेळाव्याचा लाभ घेतला.कोरोनाकाळामुळे गेली २ वर्षे या उपक्रमात खंड पडला होता; पण यावर्षी तो पुन्हा सुरू करण्यात आला. यावर्षीच्या उपक्रमाला सामाजिक कार्यकर्ते महेश काबरा यांनी जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून दिले.

भामरागड तालुक्यातील बिनागुंडा हे तसे दुर्गम; पण तेवढेच निसर्गरम्य असे स्थळ; पण त्या ठिकाणी राहणारे लोक अत्यंत गरीब आणि मागास आहेत. दोन वेळच्या अन्नाची भ्रांत असताना वैद्यकीय सुविधा मिळणे त्यांच्यासाठी दुरापास्त. ही बाब गडचिरोली येथील डॉ. शिवनाथ कुंभारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी लक्षात आणून दिली.महाराष्ट्र-छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागात वसलेल्या, अतिदुर्गम आणि मागास अशा बिनागुंडा गावात सन २०१२ पासून आरोग्य मेळावा घेण्यास सुरुवात झाली.

# ९० वर्षाच्या आजीने जिंकली धावण्याच्या स्पर्धेत ३ सुवर्णपदकं!

**यशोदा नाईकवाडे**

चेन्नई, ९ मे एखादी गोष्ट करण्यासाठी तुमची मनाची तयारी असेल आणि तुम्ही जिद्द आणि चिकाटीने त्यासाठी प्रयत्न करत असाल तर यश तुमच्यापासून फार दूर नसते याचे उदाहरण चेन्नईमधील ९० वर्षीय भगवानी देस्वाल यांनी दाखवून दिले आहे. चेन्नईमध्ये आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल मास्टर्स चॅम्पियनशीपमध्ये भगवानी यांनी ३ सुवर्णपदकं मिळवली आहेत.

चेनन्नईमधील नॅशनल मास्टर्स चॅम्पियनशीपमध्ये



वेगवेगळ्या १३ वयोगटांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये २६ राज्यांतील ३५०० जणांनी सहभाग घेतला होता. यामध्ये ९० पार केलेल्या भगवानी देस्वाल आजी सुसाट धावत होत्या. इतकंच नाही तर धावण्याच्या स्पर्धेत अव्वल येत त्यांनी ३ सुवर्णपद पटकावली आहेत.

भगवानी यांच्या या कौतुकास्पद कामगिरीचे देशभरामध्ये चर्चा होत आहे. आता जूनमध्ये फिनलंड येथे जागतिक मास्टर्स स्पर्धेत भगवानी भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. खरचं वयाची पर्वा न करता सुसाट या आजीच्या जिद्दीला आणि मेहनतीला सलाम करावा तितका थोडाच.

## निर्मिती - बी. व्होक विभाग महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी पुणे

विशेष मार्गदर्शन- प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड संकल्पना.
प्रमुख मार्गदर्शक - प्रा.आदित्य हविले.
निर्मिती सहाय्य -प्रा.डॉ. दत्तात्रय हिंगणे आणि प्रा.दत्तात्रय बिडबाग.
विशेष आभार -प्रा.शहाजी मोरे, प्रा.संग्राम गोसावी, प्रा.डॉ.पी.व्ही.रसाळ,प्रा.डॉ.यशवंत पाटणे

डिझाईन टिम - रूपेश वाघमारे, यशोदा नाईकवाडे, सागर मराठे, चिन्मय कांबळे, सनी राठोड, प्रसाद मोरे, पंकज सुतार.

डेस्क टिम - संस्कृती पवार, गंगाप्पा पुजारी, सनी ताटे, शुभम कदम.

एडिटींग टिम -संजना बंडी, प्रसाद ठाकूर, किसन काटे, शुभम गमरे, अशोक साळवे.

रिपोर्टींग टिम -अक्षय पानढवळे,निकिता जेधे, प्रिया कांबळे, निकिता देशमुख, श्वेता चिदमलवाड, प्रतिमा औसरमल, विशाल बोदगे, किर्ती पटवर्धन, अजिंक्य शिंदे, सौरभ चिदमलवाड, साहिल शिकलगार, उदयन राऊत ऋषिकेश पंदीलवाड, कृपाली गाडे.